# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 14/01/2022 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील मंगरूळ शिवार सरफराज सटोन क्रशरकडे जाणारा रोड येथे दिनांक 20/12/2021 चे 13.00 वा. ते 13.15 वा. दरम्यान ट्रक चालक आरोपी नामे– मोरेश्वर नानाजी देवतळे, वय 29 वर्ष, रा. चारगाव ता. भिवापुर याने ट्रकमध्ये लागलेली माती सफाई करण्यासाठी ट्रकचा डीला 2 ते 3 फुट उंच करून ठेवला होता. भाग्यवान सुधाकर राउत(मृतक), वय 22 वर्ष, रा. चारगाव गोटाळी ता. भिवापुर याने साफसफाई केली खाली उतरून त्याने त्याच गाडीच्या डाल्यात पल्ल्याला धरून उभा होता. त्यादरम्यान ट्रकचे ड्रायव्हरने आपले ताब्यातील ट्रक हॅडब्रेक काढुन समोर घेतला असता डाल्यामध्ये उभा असलेला भाग्यवान राउत याचा तोल जावून पडुन डाल्याच्या मागच्या पल्ल्याला धडकुन खाली जमिनीवर पडला. त्याच्या पोटाला व कमरेला मुका मार लागल्याने त्यास औषधोपचारासाठी उमरेड येथील दवाखान्यात नेले नंतर दि 21/12/2021 रोजी 01.00 वा एस रूग्णालय दिघोरीला भरती केले. उपचारादरम्यान दि. 22/12/2021 रोजी रात्री 10.15 वा. मरण पावला. पोस्टे उमरेड येथे मर्ग क 75/21 क 174 जाफौ मर्ग दाखल असून चौकशीवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी पोलिस नाईक वाघ पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279,337,338,304(अ) भादंवी. मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री. राजेश पाटील मो. क. 9049989341 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील मौजा भगवती कापुस जिनींग जवळ सावनेर येथे दिनांक 11/01/2022 चे 17.30 वा. ते 20.10 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील सुरेश रामाजी पारधी (मृतक) वय 60 वर्ष रा. खुरसगाव व मामा वासुदेव भाउराव येवले वय 53 वर्ष रा. घोटी रंगारी एमपी हे सावनेर ते केळवद रोडने पायदळ आपले घरी जात होते. त्यांचे मागुन सावनेर कडून येणारे अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित आणुन दोघांना मागून धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील सुरेश पारधी हे गंभीर जखमी झाल्याने उपचारादरम्यान मरण पावले व मामा वासुदेव येवले हे किरकोळ जखमी झाले. त्यांचा मेडीकल नागपुर येथे उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अमित सुरेश पारधी वय 30 वर्ष खुरसगाव ता.सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279,337,338,304 (अ) भा.द.वि. सह 184,134, (ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ देवशंकर गुप्ता हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 5 कि. मी. अंतरावरील टेकाडी शिवार व्हाईट लॉजच्या मागे येथे दिनांक 13/01/22 चे 12.00 वा. सुमारास रविन्द्र रामलाल पोटभरे (मृतक), वय 36 वर्ष, रा. वैशली नगर, बिनायकी मंगळवारी नागपूर हा दि 12/01/2022 रोजी कान्द्री येथे जातो म्हणून सांगून गेला. त्याच्या पत्नीने त्याला रात्री 10.30 वा. फोन केला असता विचारले असता त्याने येत आहो असे सांगितले. परंतु मृतक हा घरी आला नाही. गावावातील लोकांच्या चर्चेवरून माहित झाले की, 'कोणीतरी इसमाने गळफास घेतला आहे' यावरून फिर्यादीने जाउन पाहिले असता फिर्यादीचा मोठा भाउ याने झाडाच्या फांदीला गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अरविंद रामलाल पोटभरे वय 33 वर्ष, रा. कान्द्री कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार वरखडे मो.क्र. 9637005303 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील भगतसिग वार्ड रामटेक येथे 13/01/2022 चे 06.00 वा. चे पुर्वी सौ. अनिता संजय उइके (मृतक), वय 40 वर्ष रा. रामटेक हिने अज्ञात कारणातुन घरी कुणीही हजर नसंताना फॅनच्या दांडीला गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— तुषार युवराज देवतळे, वय 21 वर्ष, रा. भगतसिंग वार्ड रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सदासिव काठे मो.न. 9011326793 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर